# ज्ञानरचनावाद

आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांमध्ये चांगल्या सवयी वृदधींगत व्हाव्यात आणि त्यांच्या बौदिधक क्षमतेत वाढ व्हावी या दृष्टीने नागपूर विभागामधिल आश्रमशाळेमध्ये प्रथमत:च ज्ञानरचनावाद हा उपक्रम राबविण्यात आला आहे. या कार्यक्रमांतर्गत आश्रमशाळेमध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांच्या शारीरीक व मानसिक क्षमतेचा विकास व्हावा या दृष्टीने शिक्षकांचे प्रशिक्षण घेण्यात आले आहे.

शालेय शिक्षण विभागाच्या धर्तीवर ज्ञानरचनावाद हा उपक्रम राबविणारे आदिवासी विकास विभाग, नागपूर हा प्रथम विभाग आहे. या उपक्रमांतर्गत 12 आश्रमशाळांची निवड करण्यात आली. यामध्ये विविध बौदिधक क्षमतेचा स्तर असलेल्या एकत्रित विद्यार्थ्यांना बौदिधक क्षमतेचे शिक्षण पुरविण्यात येत आहे. ज्ञानरचनावाद अंतर्गत गरजाभिमुख दृष्टीकोन ठेऊन शिक्षक व पर्यवेक्षकिय कर्मचा-यांचे प्रशिक्षण घेण्यात येत आहे. प्रस्तुत उपक्रम शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी राबविण्यात येत आहे.


आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांसाठी नावीन्यपूर्ण प्रकल्प राबवा
चंद्रशेखर बावनकुळे : ज्ञानरचनावाद व संवेदना अभियानाचा शुभारंभ

